महाराष्ट्र शासन

# विज्ञान संस्था, नागपूर

रविंद्रनाथ टागोर मार्ग सिवील लाईन्स नागपूर ४४० ००१

नॅकद्वारे 'अ' दर्जा मानांकित स्वायत्त संस्था

दुरध्वनी क्रमांक : ०७१२-२५६११४८ वेबसाईट : www.iscnagpur.ac.in

Email: ioscnagpur@gmail.com

---

दिनांक : २२.०३.२०२६

## निविदा सूचना

संस्थेतील जागा नर्सरी करिता देण्यासाठी निविदा

विज्ञान संस्था, नागपूर येथील वनस्पतीशास्त्र विभागच्या जागेत नर्सरी चालविण्या करिता निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचनेमधील अटी व शर्तीच्या अधिन राहून नर्सरी चालविणा-या कंत्राटदारास आदेश दिल्यापासून ११ महिन्यांकरिता कंत्राट देण्यात येईल. कंत्राट संपल्यानंतर पुढील अतिरिक्त ११ महिन्यांकरिता कंत्राट वाढवून देण्याचे अधिकर संचालक, विज्ञान संस्था यांना राहतील. कंत्राट दिल्यानंतर तो संस्थेच्या हिताचा वाटत नसल्यास संचालक, विज्ञान संस्था, नागपूर सदर कंत्राट कोणत्याही कारणाशिवाय संपूष्टात आणू शकतील. या सूचनेसोबत जोडलेला अर्ज दिनांक ३०.०३.२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) स्विकारण्यात येईल. यानंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

(डॉ. किशोर पाटील)
संचालक
विज्ञान संस्था, नागपूर

महाराष्ट्र शासन

# विज्ञान संस्था, नागपूर

रविंद्रनाथ टागोर मार्ग सिवील लाईन्स नागपूर ४४० ००१

नॅकद्वारे 'अ' दर्जा मानांकित स्वायत्त संस्था

दुरध्वनी क्रमांकः ०७१२-२५६११४८ वेबसाईटः www.iscnagpur.ac.in

Email: ioscnagpur@gmail.com

---

# निविदा अर्ज

(संस्थमधे नर्सरी चालविण्याकरिता अर्ज)

सन ः २०२६-२७

निविदाधारकाचे नाव व मोबाईल नंबर ः

नाव ः

मोबाईल नंबर ः

नर्सरी चालविण्याचा अनुभव ः पुरावा/प्रमाणपत्र जोडाण्यात यावे

पत्रव्यवहाराकरिता पत्ता ः

अर्ज सादर करतेवेळी जमा करावयाची अनामत रक्कम ः रूपये १०००० /- (रूपये दहा हजार मात्र) चा राष्ट्रीयकृत बॅंकेचा डी.डी. "Director, Institute of Science, Nagpur" यांच्या नावे काढावा. अर्जदाराला कंत्राट न मिळाल्यास अर्जासोबत जोडलेला डी.डी. त्वरित परत केला जाईल.

नर्सरीचा कंत्राट मिळण्याकरिता मासिक भाडे निवीदा रक्कम ः (न्युनत्तम निविदा रक्कम रूपये १२०० /- रूपये एक हजार मात्र)

रूपये अंकात ः | रूपये |

रूपये अक्षरी ः --------------------------

नर्सरीच्या जागेचे मासिक भाडे दर महिन्याच्या ५ तारखेच्या आत कार्यालयात भरणे अनिवार्य राहील.

अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे ः

१. नर्सरी चालविण्याचा अनुभव पुरावा/प्रमाणपत्र
२. आधार कार्डची झेरॉक्स

दिनांक निवीदाधारकाची सही

## संस्थेतील जागा नर्सरी करिता देण्यासाठी अटी व शर्ती :

खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कंत्राटदारास नर्सरी चालविण्याकरीता देण्यात येत आहे. कंत्राटदाराकडून या अटींचे पालन न झाल्यास सदर कंत्राट संपूष्टात आणण्याचे अधिकार संचालक विज्ञान संस्था, नागपूर यांना आहेत.

१. संस्थेचा परिसर सुशोभित ठेवणे.
२. संस्थेतील गार्डन व्यवस्थित करणे.
३. वनस्पती विभागाच्या सहकार्याने बॉटॅनिकल गार्डन तयार करणे.
४. संस्थेच्या परिसरात पालापाचोळा/ कचरा होणार नाही याची काळजी घेणे.
५. बगिचामधील झाडांची कटींग/ट्रीमींग करणे.
६. बगिचातील तण काढणे.
७. संस्थेच्या विविध कार्यक्रमांना गरज असल्यास सुशोभिकरणासाठी फुलझाडांच्या कुंडया तात्पुरती पुरविण्याची व्यवस्था करणे. ही फूलझाडे ने-आण करण्याची जबाबदारी कार्यक्रम टिचर-इन-चार्ज यांची राहील. या करिता टिचर-इन-चार्जने गरजे प्रमाणे आवश्यक कुंडयांचे पत्र कंत्राटदारास देणे आवश्यक राहील.
८. संस्थेच्या कार्यक्रमांमधे सत्कार समारंभाकरिता टिचर-इन-चार्ज ला गरजेनुसार मोफत सॅपलींग देणे. टिचर-इन-चार्जने कंत्राटदारास पत्र देणे आवश्यक राहील.
९. संस्थेच्या कर्मचारी, अधिकारी व विद्यार्थ्यासोबत फुलझाडांसंबंधी चर्चा, देवाणघेवाण करतांना तसेच परिसरात सन्मानपूर्वक वागणूक ठेवणे.
१०. फुलझाडांची विक्री करतांना ग्राहक संस्थेच्या परिसरात (नर्सरी सोडून) फिरणार नाही याची काळजी घेणे.
११. संस्थेने नर्सरी करिता सोय केलेल्या गेटनेच वाहनांची ये जा करणे
१२. अनावश्यक व्यक्ति नर्सरी मधे जमा होणार नाही याची काळजी घेणे
१३. संस्थेच्या परिसरात धुम्रपान करणे, तंबाखू, गुटखा खाणे यास बंदी आहे. आढळून आल्यास आपले कंत्राट रद्द करण्यात येईल
१४. नर्सरीचा होणारा पालापाचोळा नेमून दिलेल्या ठिकाणी एका पीटमधे (खड्डयामधे) टाकून खत तयार करणे. इतरत्र पालापाचोळा टाकू नये.
१५. संस्थेने नेमून दिलेल्या जागेवरच झाडांची व्यवस्था करावी किंवा वनस्पतीशास्त्र विभागातील तज्ञांनी सांगितल्या प्रमाणे त्यांच्या गरजेनुसार मांडणी करावी.
१६. **वनस्पतीशास्त्र विभागाला त्यांच्या आवश्यकतेनुसार झांडांची लागवड व सोय ठेवण्यासाठी मदत करणे, या करिता लागणारा निधी वनस्पतीशास्त्र विभागाकडून दिला जाईल.**

(डॉ. जयराम खोब्रागडे)
संचालक
विज्ञान संस्था, नागपूर